# प्रकरण - १ ले

# दलित आत्मकथनांचे स्वरुप आणि वाटचाल

**प्रस्तावना**

१) आत्मचरित्र संकल्पना

२) आत्मकथन संकल्पना

३) स्वकथन संकल्पना

४) आत्मचरित्र व आत्मकथन यांची तुलना

५) निष्कर्ष

६) दलित आत्मकथनांचे स्वरुप

६.१) दलित आत्मकथनांतील समाजविषयक जाणीव

६.२) दलित आत्मकथनातील समाजचित्रे

६.३) दलित आत्मकथनातील भुकेचे चित्रण

६.४) दलित आत्मकथनातील अस्पृश्यतेचे चित्रण

६.५) दलित आत्मकथनातील व्यक्तिरेखा

६.६) दलित आत्मकथनातील स्त्रीजीवन

६.७) दलित आत्मकथनातील येणारे ग्रामीण जीवन

६.८) दलित आत्मकथनातील भाषा आणि निवेदन

७) दलित आत्मकथनांची वाटचाल

८) सारांश

९) निष्कर्ष

१०) संदर्भ ग्रंथसूची

**प्रस्तावना :-**

दलित साहित्य हे मुख्यत: १९६० नंतरच्या मराठी वाड्.मयातील एक मूलगामी विचार केंद्र आणि अपरिहार्य अशी सामाजिक घटना म्हणून मानले गेले. दलितसाहित्याने संपूर्ण, स्वातंत्र्याचा पुरस्कार करुन मानव हा सामाजिक,धार्मिक, आर्थिक,राजकीय,सांस्कृतिक गुलामगिरीतून मुक्त झाला पाहिजे. असा आग्रह धरला. वरीलपैकी कोणत्याही स्वांतत्र्याला जीवनात साकार करायचे असेल तर संघर्ष हा अटळ असतो. म्हणून सम्यक क्रांतीचे लक्ष हा दलित साहित्य प्रवाहाचा मध्यवर्ती गाभा आहे. दलित साहित्याचे उर्जास्त्रोत डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आहेत. आंबेडकरांनी सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रात अस्पृश्यांच्या उद्धारासाठी ज्या विविध चळवळी केल्या व जे विचार तत्वज्ञान मांडले हे सर्व दलित साहित्याची प्रेरणा आहे. जात, वर्ण, जातिव्यवस्था इ. विषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूलगामी संशोधन केले. वर्णव्यवस्थेवर उभारलेला हिंदू समाज हा बीनशिडीच्यामनोऱ्यासारखा आहे. या मनोऱ्यात राहणाऱ्या लोकांनी ज्या मजल्यावर जन्म घेतला त्याच मजल्यावर मरावे अशी व्यवस्था केलेली आहे. त्यामुळे समाजामध्ये विसंगती व अनागोंदी चालते असे आंबेडकरांनी सांगितले. या सर्वातून आपली सुटका करुन घ्यायची असेल तर दलित समाजाने शिक्षण घेऊन आपल्या हक्कासाठी संघटित होऊन संघर्ष केला पाहिजे असा संदेश डॉ. आंबेडकरांनी दिलेला आहे. बाबासाहेबांनी परदेशात अर्थशास्त्राचे सूक्ष्म अध्ययन केले. भारतीय दलित जाति-जमातींना जे अजन्म दारिद्रय भोगावे लागत आहे. त्यापाठीमागे उच्चवर्णीयां-कडून दलितांचे होणारे सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक शोषण आहे. असे त्यांनी संशोधनातून सिद्ध केले. आर्थिक दृष्टया परावलंबी असलेला समाज जी

मानसिक गुलामगिरी भोगत होता, त्याचे मूळ हिंदू समाजव्यवस्थेत आहे. असे त्यांनी आवर्जून सांगितले. 'शुद्र पूर्वी कोण होते?', 'अस्पृश्यतेचा उगम,' 'अस्पृश्यांसाठी गांधीनी आणि काँग्रेसने काय केले'? इ. विविध ग्रंथातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यता निर्मूलनाच्या लढ्याची तात्विक भूमिका मांडली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाच्या उत्थानासाठी ज्या विविध चळवळी केल्या त्यामध्ये चवदार तळ्याचा सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश सत्यागृह, हिंदू कोडबील किंवा पुणे करार असेल या सर्वांमागे दलित समाजाला समानतेची वागणूक मिळावी, हेच उद्दिष्ट होते. या संबंध पार्श्वभूमीतून दलित समाजास नवजीवन मिळत होते. दलित समाजास आत्मभान येत होते. याचा परिणाम म्हणजे तरुण मने जागृत झाली. आपल्या समाजाला जागृत करण्यासाठी सुशिक्षित दलित तरुणांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आत्मसात करुन लेखनी हातात घेतली व दलित साहित्याचा स्वतंत्र असा प्रवाह निर्माण झाला.

१९२५ पासून दलित साहित्यातील पहिली पिढी लेखन करताना दिसते. सुरवातीला बहिष्कृत भारत, जनता, प्रबुद्ध भारत आणि अन्य वृत्तपत्रे-नियतकाली-कांमधून स्फूट स्वरुपात लेखन प्रकाशित होत होते. यात प्रामुख्याने ना.रा.शेंडे, तुकाराम पुरोहित, बंधूमाधव, अण्णाभाऊ साठे आणि शंकरराव खरात यांनी विपुल अशी साहित्यनिर्मिती केली. दलित साहित्याच्या दुसऱ्या पिढीने कविता, कथा, आत्मकथन, कादंबरी, नाटक, वैचारिक लेखन या वाड्.मय प्रातांत विपुल प्रमाणात भर घातली. त्यामध्ये नारायण सुर्वे, केशव मेश्राम, प्रल्हाद चेंदवणकर, दया पवार, प्र. ई. सोनकांबळे, माधव कोंडविलकर, लक्ष्मण माने, प्रेमानंद गज्वी, दत्ता भगत, वामन होवाळ, अमिताभ, योगिराज वाघमारे, वामन निंबाळकर इ. साहित्यिकांचा

प्रामुख्याने उल्लेख करता येईल. तर शरणकुमार लिंबाळे, रामनाथ चव्हाण,लोकनाथ यशवंत, प्रभाकर दुपारे, सुरेखा भगत, बळी खैरे, सुषमा अंधारे, प्रज्ञा लोखंडे, तु.लि. कांबळे, लक्ष्मण गायकवाड इ. तिसऱ्या पिढीतील दलित साहित्यिकांची प्रामुख्याने नावे सांगता येतील. पहिल्या पिढीची वेदना, दुसऱ्या पिढीचा विद्रोह आणि तिसऱ्या पिढीचा बुद्धपुरस्कृत मानवतावाद असा दलित साहित्याचा विकास झालेला दिसतो.

अलिकडे दलित साहित्य या संकल्पनेऐवजी बौद्ध साहित्य, फुले-आंबेडकरी साहित्य,परिवर्तनवादी साहित्य,बहुजन साहित्य,अब्राम्हणी साहित्य,विद्रोही साहित्य, आंबेडकरवादी साहित्य या नावाचा नाहक आग्रह धरला जातोय. दलित साहित्य ही संकल्पना विश्वसाहित्याच्या कक्षेमध्ये गतिमान असणारी संकल्पना आहे. त्याच बरोबर दलित या संज्ञेला उत्थानाचा आत्मभान जागृतीचा, मानवतावादी विचारांचा स्पर्श झालेला आहे. त्यामुळे नामांतराच्या वाद-विवादापेक्षा दलित साहित्य ही संकल्पनाच स्विकारणे योग्य होईल.

दलित साहित्यामध्ये सुरवातीला कविता नंतर आत्मकथन आणि तद्नंतर कथा,कादंबरी,नाटक,वैचारिक लेखन इ.वाङ्.मयप्रकार खऱ्या अर्थाने विकसित झाले.

दलित आत्मकथन हा मराठी साहित्यातील एक समृद्ध साहित्यप्रकार आहे. 'आत्मकथन' हा वाङ्.मयप्रकार दलित साहित्यिकांकडून मोठ्या प्रमाणात हाताळला गेला. यातूनच आत्मकथनाचा एक नवा आकृतिबंध सिद्ध होत गेला व त्याला ऐतिहासिक अधिष्ठान प्राप्त झाले. दलित आत्मकथने ही दलित समाजाचा दस्ताऐवज आहेत. दलित लेखकांनी जे जगले, जे भोगले, जे अनुभवले ते लिहिले म्हूणन तत्कालिन समाजजीवनाचे अनेक संदर्भ यात पहायला मिळतात.

'आत्मकथन' या संकल्पनेसंबधी आत्मचरित्र, स्वकथन या संकल्पनांची मांडणी केली जाते. प्रबंधिकेचा हा महत्वाचा घटक असल्यामुळे यासंबंधीच्या विविध मतमतांतराचा आढावा घेणे महत्त्वाचे ठरेल.

## १. 'आत्मचरित्र ' संकल्पना

**व्याख्या :**

१) **प्रा. रा. ग. जाधव -**

" आपल्या जीवनविषयक अनुभवांचे व तदनुषंगाने आपल्या व्यक्तिमत्वाचे स्वत: लेखकाने लेखन रुपाने घडविलेले दर्शन म्हणजे आत्मचरित्र होय." (१)

२) **डॉ. स.दा. कऱ्हाडे -**

" स्वत:च्या जीवनाचे दुरस्थपणे सिंहावलोकन वृत्तीने केलेले अवलोकन आणि त्याविषयीचे प्रांजळ निवेदन म्हणजे आत्मचरित्र होय. " (२)

३) **डॉ. वसंत बोरगावकर -**

" स्वत:च लिहिलेली स्वत:च्या जीवनाची कहाणी म्हणजे आत्मचरित्र होय. " (३)

४) **डॉ. विमल भालेराव -**

" स्वजीवन तटस्थपणे न्याहाळून त्यातून आवश्यक त्या बाबींची निवड करुन त्यांचे प्रांजळ निवेदन व कलात्मक मांडणी यातून 'स्व' चित्र रेखाटणे म्हणजे आत्मचरित्र होय." (४)

आत्मचरित्राविषयी अनेक मान्यवर समीक्षकांनी आपली वेगवेगळी मते व्यक्त केलेली आहेत. प्रा. रा.ग.जाधव यांनी असे मत प्रतिपादन केले आहे की, आत्मचरित्र लिहिलेल्या व्यक्तीने आपल्या जीवनात आलेल्या बऱ्यावाईट अनुभवांचे चित्रण केलेले असले पाहिजे. यातूनच त्यांच्या स्वभावाचे दर्शन त्याने लेखनरुपाने दाखविलेले असले पाहिजे. अशी भूमिका मांडलेली आहे. प्रा. रा. ग. जाधव यांचे हे मत आत्मचरित्राची योग्य व्याख्या करते. तर डॉ. स दा कऱ्हाडे यांना असे वाटते की, आत्मचरित्राचे लेखन करणाऱ्या व्यक्तीने असे लेखन केले पाहिजे की, एखाद्या समोर बसलेल्या व्यक्तीचे गुणवर्णन करावे की, ज्यात त्याच्या चांगल्या वाईट गुणांचे वर्णन त्यांच्या मानपानाचा विचार न करता ते सांगावे. त्याप्रमाणे जे होते त्याला आत्मचरित्र म्हणावे. तर डॉ. वसंत बोरगावकर असे म्हणतात की, आत्मचरित्र लेखन करणाऱ्या व्यक्तीने स्वत:च त्यांच्या जीवनाची कहाणी लिहिणे म्हणजे आत्मचरित्र. ही आत्मचरित्राची व्याख्या आत्मचरित्र या संकल्पनेच्या म्हणावी तितकी जवळ जाणारी नाही. डॉ. विमल भालेराव असे मत प्रतिपादन करतात की, आत्मचरित्र लिहिणाऱ्या व्यक्तीने त्याचे स्वत:चे जीवन तटस्थपणे पारखून आवश्यक अशाच प्रसंगांची निवड करुन त्यांचे प्रामाणिकपणे प्रांजळ निवेदन व त्या सगळ्या आलेल्या अनुभव विश्वाला कलात्मक जोड देऊन केलेली लेखनरुपातील मांडणी म्हणजे आत्मचरित्र म्हणता येईल.

वरील मान्यवर व्यक्तींच्या व्याख्यांचा विचार करता प्रा. रा. ग. जाधव व डॉ. विमल भालेराव यांच्या व्याख्या आत्मचरित्राची संकल्पना उलगडून दाखवतात. कारण की, आपल्या जीवनाचे दर्शन व त्या अनुषंगाने लेखकाने कळत नकळत पणे

आपल्या स्वभावाचे केलेले दर्शन, तसेच आपल्या व्यक्तीमत्वाचे वेगवेगळ्या प्रसंगाच्या साहाय्याने घडविलेले दर्शन हे सर्व मिळून आत्मचरित्र ठरेल. तर डॉ.विमल भालेरावांच्या मते, स्वत:च्या जीवनातील गुणदोषांकडे तटस्थपणे पाहण्याची दृष्टी माणसाकडे असावी लागते. आणि मग यादृष्टीने त्यातील आवश्यक भाग घेऊन व अनावश्यक भाग टाकून देऊन आवश्यक भागांची आपल्याकडे असलेल्या कलात्मक गुणाच्या साहाय्याने व कलात्मक मांडणीने रेखाटलेले चित्रण आत्मचरित्रात येते. हे मत आत्मचरित्राच्या व्याख्येच्या अगदी जवळ जाणारे आहे. परंतु डॉ. वसंत बोरगाव रांच्या मताचा विचार करता माणसाला जगत असताना आलेल्या सर्वच अनुभवांची नुसती मांडामांड म्हणजे आत्मचरित्र नव्हे, त्यामुळे आत्मचरित्र या संकल्पनेचा उचितबोध होत नाही. तसेच डॉ. स'दा कऱ्हाडे यांच्या मताचा विचार करता आत्मचरित्र या वाड्.मयाच्या संकल्पनेची नेमकी उकल होत नाही. त्यांनी प्रतिपादन केलेले मत विचारात घेता,व्यक्तीने दुरस्थपणे जीवनाचे सिंहावलोकन करीत असता आयुष्यातील बऱ्याच चांगल्या वाईट गोष्टी लेखकाला दिसतात पण त्या सर्व अनुभवांतील निवडक अनुभवांची निवड फार महत्त्वाची असते. ती जर केली नाही व आठवेल त्या अनुभवाची फक्त मांडणीच केली तर ते आत्मचरित्र ठरणार नाही.

जगलेल्या सगळ्या जीवनाविषयी प्रांजळ निवेदन करताना ते लेखन कितपत यशस्वी झाले आहे. ह्या विषयी मनाची द्विधा अवस्था निर्माण होते. यामुळे ही व्याख्या आत्मचरित्र या संकल्पनेचा म्हणावा तितका चांगला उलघडा करू शकत नाही. त्यामुळे आत्मचरित्र म्हणजे काय? या प्रश्नाचा विचार करता आत्मचरित्र लिहिणाऱ्या व्यक्तीने आपण जीवन जगत असताना आलेल्या सर्व चांगल्या वाईट

अनुभवांच्याकडे एका परक्या किंवा तटस्थ माणसाच्या दृष्टीने पाहून निवडक अशा प्रसंगाचे लेखन करुन स्वत:च्या स्वभावाचे चित्र रेखाटणे होय.

वरील सर्व मान्यवर समीक्षकांच्या व्याख्याची चर्चा करता असे मत मांडता येईल की, आयुष्य जगत असताना प्रत्येक दिवशी माणसाला अनेक कडूगोड असे वेगवेगळे अनुभव येऊन गेलेले असतात. स्वत:च्या जीवनात येणाऱ्या व येऊन गेलेल्या सर्व अनुभवांना माणूस कधी यशस्वीपणे तर कधी अयशस्वीपणे तोंड देत असतो. त्यामुळे काही वेळा त्याची प्रगती होते. तर काही वेळा त्याचे मानसिक, शारीरिक नुकसान होते. या सर्व चांगल्या वाईट प्रसंगाचे तटस्थ किंवा दुरस्थ माणसाप्रमाणे केलेले सिंहावलोकन व या सगळ्या अनुभवांची कलात्मकरितीने केलेली मांडणी स्वत:च्या शब्दात अक्षरबध्द केलेले अनुभवकथन म्हणजे आत्मचरित्र म्हणता येईल.

आत्मचरित्र हा आत्मशोध असतो,'स्व'रुपाकडे ज्याला तटस्थपणे पाहता येते तो आत्मचरित्र लिहु शकतो. आत्मगौरव आत्मसमर्थन आत्मटिका, आत्मनिर्भत्सना इ.चे प्रमाण अवाजवी असले की ते लेखन कलात्मक पातळीवर जाऊ शकत नाही. जे आपण भोगले ते प्राजंळपणे, मोकळेपणाणे कथन करता आले पाहिजे. ज्याच्याजवळ सांगण्यासारखे काही आहे, त्याचेच कथन वाचनीय वाटेल. आत्मचरित्र म्हणजे काही व समग्र इतिहास नव्हे बालपणापासून अखेरपर्यंत सगळे सांगितलेच पाहिजे असे नाही. वस्तुत: आपल्या आयुष्याच्या कोणत्या भागापासुन आत्मवृत्ताला सुरवात करावी आणि ते कोठे संपवावे. याबाबतीत आत्मचरित्रकाराला स्वातंत्र्य आहे. अथपासुन सर्व घटना सांगत गेल्यामुळे त्याला आढाव्याचे स्वरुप प्राप्त होईल.शिवाय स्मरणशक्तीला मर्यादा आहेत. तसेच जे जे आठवेल ते ते लिहित राहिले तर ते लेखन विस्कळीत होईल. आत्मचरित्रातून आपल्याला जाणवायला हवे ते मी चे बहुरंगी व्यक्तीमत्व, त्यानी घेतलेल्या अर्थपुर्ण जीवनातूनच. म्हणून आत्मचरित्राचा विचार करताना आत्मप्रकटीकरण व प्रांजळनिवेदन याला अनन्य साधारण महत्व आहे. आत्मचरित्र म्हणजे व्यक्तीने स्वत:च्या जीवनाचे केलेले सिंहावलोकन व त्याची योग्य कलात्मक मांडणी होय. असेच म्हणावे लागते.

## २. आत्मकथन - संकल्पना

**व्याख्या :**

**१) प्रा.रा.ग. जाधव -**

" तरुण मन आणि उतारवयीन प्रौढ मन यांची अनुभवाकडं पाहण्याची दृष्टी वेगळी असते. अन्यायाची चीड आणि त्या विरुद्ध घेतलेला लढाऊपणाचा पवित्रा हे युवक मनस्थितीशी अधिक सुसंगत असते. किंबहुना युवामनाची ती खास लक्षणेच असतात याचं दर्शन आत्मकथनामध्ये घडतं " [५]

**२) डॉ. भालचंद्र फडके -**

" आत्मकथन करणारा लेखक कालच्या जीवनाबद्दल लिहित असतो. जो गतकाळ त्याच्यासमोर आहे त्यापासून दूर असलेला लेखक त्यातले चैतन्य शोधत असतो. आजचा आत्मकथा निवेदक कालपासून दूर असलेला असल्यामुळे अनेक दृष्टीने निराळा आहे. सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवन जगणारा हा लेखक काल अगदी नगण्य होता." [६]

**३) डॉ. स दा कऱ्हाडे -**

"स्वत:च स्वत:चे चरित्र लिहावयाचे म्हणजे एक प्रकारचे आत्मनिवेदन आत्मप्रकटीकरण आत्मकथन करण्यासारखे आहे. " [७]

**४) प्रा. प्रकाश मेदककर -**

"आत्मकथन व आत्मचरित्र यामध्ये लेखकाचा वयोगट जीवनाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टीकोन आशयद्रव्याशी लेखकाचे असणारे गतीमान नाते व त्याला पूरक असणारी भाषिक शैली यामुळे आशय व भाषिक शैली यांच्या दृष्टीने अंतर्बाह्य पूरक असल्याचे दिसून येते." [८]

## ५) प्रा. चंद्रकुमार नलगे व डॉ. गंगाधर पानतावणे -

" कथन हे सातत्याचे प्रतीक आहे. तर कथेला शेवट असतो. ती पूर्णत्वाचा प्रत्यय देते. ती कुठे तरी थांबते, आत्मकथनाचा प्रवास मात्र सुरुच असतो. या दृष्टीने विचार करता 'दलित आत्मकथन' ही संज्ञा अधिक अर्थपूर्ण व अन्वयर्थक वाटते." (९)

आत्मकथन या साहित्य प्रकाराची संकल्पना स्पष्ट करत असताना अनेक मान्यवर समीक्षकांनी आपली वेगवेगळी मते मांडलेली आहेत. या संकल्पनेविषयी प्रा. रा.ग. जाधव असे मत प्रतिपादन करतात की , एखाद्या प्रसंगाकडे माणूस तरुण असताना एका दृष्टीने पाहतो व तीच व्यक्ती वृद्ध झाल्यानंतर त्या प्रसंगाकडे पाहण्याची तिच्या दृष्टीत फरक पडतो. त्यामुळे वयाचा हा फरक फार मोठ्या प्रमाणात विचारात घ्यावा लागतो.एखाद्या अन्यायकारक प्रसंगाकडे तरुण मन असलेली व्यक्ती किंवा अन्यायाची चीड असणारी व्यक्ती ही लढाऊणाच्या पावित्र्याने विचार करेल. किंवा त्या अन्यायाविरुद्ध चिडून विद्रोहात्मक पवित्रा घेईल. असा पवित्रा दलित तरुण मनानी या अन्यायग्रस्त रुढीवर घेतला आहे. त्याच्या लेखनाला आत्मकथन म्हणावे हे प्रा. रा. ग. जाधव यांचे मत आत्मकथन या संकल्पनेच्या जवळ जाणारे आहे. तर डॉ. भालचंद्र फडके यांच्या मते आत्मकथन लिहिणारी व्यक्ती काल अगदी नगण्य म्हणजे ज्याला आर्थिक, सामाजिक किंवा सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रात कुठल्याही प्रकारचे महत्व नव्हते, असे जीवन जगत होती.

आज मात्र या सर्वच क्षेत्रात त्यांचा वावर मोठ्या प्रमाणात होताना दिसतो. आज मागे वळून पाहताना तो त्या कालच्या जीवनातील चैतन्य शोधू पाहतो किंवा कालच्या जीवनातील जिवंतपणा शोधू पाहतो. या जिवंतपणाच्या शोधातून लिहिलेले लेखन म्हणजे आत्मकथन होय. डॉ. भालचंद्र फडके यांचे हे मत आत्मकथनाची

संकल्पना स्पष्ट करण्यासाठी पुरेपुर योग्य असे वाटते. तर डॉ. स दा कऱ्हाडे म्हणतात त्याप्रमाणे स्वत:चे चरित्र लिहिताना किंवा आत्मनिवेदन करताना आत्मप्रकटीकरण होते. त्याला आत्मकथन म्हणावे. परंतु येथे वयाचा विचार केला नाही किंवा आत्मप्रकटीकरण करता युवा मनाचा विचार केलेला नाही. त्यामुळे त्यांचे हे मत आत्मकथनाची संकल्पना स्पष्ट करण्यास पुरेसे आहे असे वाटत नाही. त्यात बऱ्याचशा उणीवा असलेल्या आपल्याला दिसून येतात.तसेच प्रा. प्रकाश मेदककर यांचे मत ही आत्मकथन या संकल्पनेच्या जवळ जाणारे वाटते. त्यांच्या मते वय हा महत्त्वाचा घटक आत्मकथन आणि आत्मचरित्र यातीलफरक स्पष्ट करण्यास पुरेसा आहे. त्याच बरोबर जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आशयाशी असणारे लेखकाचे गतिमान नाते तसेच त्याची लेखनशैली या सर्वांचा विचार करता आत्मचरित्रापेक्षा आत्मकथन ही संज्ञा कशी वेगळी आहे हे त्यांनी चांगले स्पष्ट करुन सांगितले आहे. या सगळ्यांच्या बरोबर प्रा. नलगे व डॉ. पानतावणे यांनी दलित आत्मकथने या पुस्तकाच्या प्रस्तावनेत आत्मचरित्रापेक्षा आत्मकथन ही संज्ञा कशी योग्य आहे हे साधार पटवून दिले आहे. त्यांच्या मते कुठल्याही कथेला जसा आरंभ असतो तसा विशिष्ट कथनानंतर शेवट असतो. परंतु आत्मकथन सांगत असताना सतत सांगण्याची प्रक्रिया घडतअसते. आत्मकथनातील जीवनाचे कथानक लेखक वरचेवर सांगत असतो कारण अजून ही खूप सांगायचे असते व तो सततपणे सांगत असतो. आत्मकथनात वापरली जाणारी कथन प्रक्रिया दलित आत्मकथनांच्या बाबतीत घडते. त्यामुळे प्रा. नलगे व डॉ. पानतावणे यांचे हे मत आत्मकथन संकल्पनेचे योग्य आकलन करुन देते. त्यामुळे ते ग्राह्य असेच आहे.

वरील सर्व मान्यवर अभ्यासकांच्या मताचा आढावा घेतला असता प्रा. रा. ग. जाधव म्हणतात त्याप्रमाणे युवक मनाने अन्यायाविरुद्धची चीड आणि त्या विरुद्ध घेतलेला लढाऊपणाचा पवित्रा हे दलित आत्मकथनांच्या मधून चित्रित होते. तर भालचंद्र फडके यांच्या मते भूतकाळात जगलेल्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जीवनाचे नगण्यरुप दलित लेखक आत्मकथनात प्रकट करतो. डॉ. स. दा. कऱ्हाडे यांच्या मते आत्मप्रकटीकरण करणे म्हणजे आत्मकथन करणे. तर प्रा. नलगे व डॉ.पानतावणे यांना आत्मकथन हीच संज्ञा अतिशय योग्य वाटते. या सर्वांच्या मतांचा विचार करता असे मत व्यक्त करावेसे वाटते की, ही आत्मकथने म्हणजे दुभंगलेल्या मनाचा मुक्ताविष्कार आहेत. शिक्षणाने हे बळ आले आहे. आतल्या आत पोखरणारं दु:ख दलित नायकांच्या समाजाने पेललं आहे. वर्षानुवर्षे सहन केल आहे. या सर्व शोषणाच, दु:खाचं, अन्यायाचं, अत्याचाराचं, पिळवणूकीचं चित्रण आत्मकथनांच्या मधून येत व त्या विरुद्धचा विद्रोह ही येतो. त्यामुळे लेखकांच्या या सर्व आत्मप्रकटीकरणाला संकलन किंवा आत्मचरित्र या संज्ञेपेक्षा आत्मकथन हीच संज्ञा अतिशय योग्य अशी ठरते.

## ३. स्वकथने - संकल्पना

**व्याख्या :**

**१) प्रा. अशोक पाटील -**

''भारतीय समाज जीवनात जो समाज संस्कृतीच्या नावाखाली तुडवला गेला. ज्याला रीतिरिवाज परंपरा व नीतिमूल्यांच्या नावाखाली हिंदू समाजाने स्वत:चे दास म्हणून वागविले. त्या समाजाच्या भावनेच्या कोंडीचा पिढ्यान्पिढ्या मुक्या असलेल्या मनाचा त्याच्या वेदनांचा शब्दाविष्कार म्हणजे दलित स्वकथने होय.' (१०)

## २) डॉ. यशवंत मनोहर -

" 'आत्म' हा शब्द सोबतीला कर्मविपाकाचा लज्जास्पद आणि खोटारडा सैद्धांतिक पसारा घेऊन येतो. येथील संस्कृतीने "आत्मा" या विचाराव्दारे जगात कुठेही नसलेला शोषणाचा एक विलक्षण आकृतीबंध विषमतेचा विषारी विचार व्यूह साकार केला आहे. दलितांच्या शोषणाची केंद्रवर्ती आचारशीला असलेला 'आत्मा' हा शब्द दलितांच्या स्वकथनांना लावणे हे त्यांच्या नास्तिक प्रेरणेला गुलाल बुका लावण्यासारखे आहे.त्यामुळेच दलितांच्या या अनुभव कथनपर लेखनाला 'स्वकथन' हा शब्द वापरणे उचित होईल." (११)

दलित आत्मकथनाला आत्मचरित्र म्हणावे, आत्मकथन म्हणावे की स्वकथ्न म्हणावे अशाप्रकारे विविध विचार मराठी साहित्यात मांडले गेले आहेत. डॉ. गंगाधर पाणतावने दलित आत्मचरित्राला आत्मकथन म्हणावे असा विचार मांडतात. प्रा. अशोक पाटील, डॉ.यशवंत मनोहर, आरती कुसरे-कुलकर्णी इ. समीक्षक त्याला स्वकथन म्हणावे असा विचार मांडतात. परंतु विविध समीक्षक, अभ्यासक यांच्या मतांचा विचार करता, दलित तरुण ज्यावेळी लेखन करतो तो कांही आत्मा या आध्यात्मिक संकल्पना दृढ करण्यासाठी करत नसतो किंवा आत्मकथन करतो, म्हणजे काही 'आत्मा' नामक गोष्टीला किंवा कुठल्याही हिंदू रुढीला शरण जाऊन लेखन करत नसतो तर आपल्याला जीवन जगत असताना आलेल्या अनुभवांचे तटस्थपणे अवलोकन करत असताना फक्त आपल्या अनुभवांचे आत्मप्रकटीकरण करत असतात. त्यामुळे आत्मप्रकटीकरण करण्यासाठी कुठल्याही व्यवस्थेचा किंवा धर्माचा कांही संबंध असत नाही. तेव्हा आत्मकथन करत असताना हे प्रकटीकरण करणारे लेखक आत्मा या शब्दाने करत नाहीत.

अनेक वर्षे झेललेला अन्याय अंतरंगात खदखदत असतो. या अन्यायाविरुद्ध या आत्मकथांनांच्यामधून विद्रोह पुकारलेला आपल्याला दिसून येतो. दलित आत्मकथनांच्यामध्ये कांही या अन्यायग्रस्त रुढीला किंवा परंपरेला शरण जाणारी जाणीव नसते. त्यामुळे आत्मायेत असेल तर त्यात हिंदू संस्कृतीला गुलाल किंवा बुका लावण्याचा सवाल येत नाही. तर आत्मगत संवाद या अर्थाने तो शब्द येतो. त्यामुळे 'स्व' या शब्दा पेक्षा 'आत्म'हाच शब्द योग्य वाटतो. व त्यामुळे दलित आत्मकथन हीच संज्ञा आत्मचरित्र व स्वकथन या दोन संज्ञांच्या पेक्षा योग्य वाटते. 'स्व' कथनातून फक्त स्वत:चे कथन असा अभिप्रेत होतो. परंतु दलित आत्मकथनांच्या मधून त्याच्यापेक्षा त्या त्या लेखकांच्या अनेक पिढ्यानी सोसलेल्या व साहिलेल्या मना-मनात रुतून बसलेल्या अन्यायग्रस्त परिस्थितीचे चित्रण असते. त्यामुळे आत्मकथन ही संज्ञा योग्य वाटते.

## ४. निष्कर्ष

१) आत्मचरित्र लिहिलेल्या व्यक्तीने आपल्या जीवनात आलेल्या बऱ्याचशा परंतु निवडक अशा अनुभवांचे चित्रण केलेले असले पाहिजे.

२) आत्मचरित्र लिहिताना किंवा विविध अनुभवांचे दर्शन घडविताना त्यातून लेखकाच्या स्वभावाचे दर्शन घडले पाहिजे.

३) एखादी समोर बसलेली व्यक्ती जसे आपले चांगले वाईट गुण सांगते त्या भूमिकेतून आत्मचरित्राचे लेखन झाले पाहिजे.

४) दुसऱ्या कोणत्या व्यक्तीने त्या व्यक्तीचे चरित्र न लिहिता स्वत:च एखाद्या व्यक्तीने आपल्या आयुष्यातील कांही मजकूर लिहून ठेवला असेल तर त्या मजकूराला आत्मचरित्र म्हणता येईल.

५) व्यक्तीने स्वत:चे जीवन तटस्थपणे न्याहाळून त्यातील निवडक प्रसंगाची आवश्यकता जाणून त्यातील योग्य प्रसंगाची निवड करीत प्रामाणिकपणे व प्रांजळपणे जीवन जगत असताना आलेल्या अनुभवांना कलात्मक जोड देत केलेली लेखन रुपातील मांडणी म्हणजे आत्मचरित्र म्हणता येईल.

६) जीवनात आलेल्या सर्वच अनुभवांची नुसती मांडामांड म्हणजे आत्मचरित्र नव्हे.

७) आत्मकथन लिहिणारी व्यक्ती ही वयाने तरुण असते तर आत्मचरित्र लिहिणारी व्यक्ती ही वयाने वृद्ध असते.

८) वयातील महत्त्वाच्या फरकामुळे अनुभवाकडे पाहण्याचा दृष्टीकोन येथे लक्षात येतो.

९) भूतकाळात दलित व्यक्तींना आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रात कुठल्याही प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते. आज मात्र याच दलितांचा या सर्वच क्षेत्रांच्यामध्ये त्यांचा वापर मोठ्या प्रमाणात आहे. हा नायक आज भूतकाळात पाहतो. व दिसणारा फरक आत्मकथनात लिहितो.

१०) जीवन जगताना आलेल्या अनुभवांचे आत्मनिवेदन करताना लेखकाच्या मनाचे आत्मप्रकटीकरण केलेले आत्मकथनात आपल्याला दिसून येते.

११) कथन ही सातत्याची प्रक्रिया असल्यामुळे दलित आत्मकथनाला ती पुरेपूर लागू पडते.

१२) भारतीय समाज जीवनात संस्कृतीच्या बुरख्याखाली कोंडलेल्यांचे दु:ख आत्मकथनात येते.

१३) 'आत्मकथन्' या शब्दात येणारा 'आत्म' हा शब्द आत्मा या अर्थाने येत नाही तर आत्मप्रकटीकरण या अर्थाने येतो.

१४) 'स्वकथना' पेक्षा आत्मकथन ही संज्ञा योग्य वाटते.

१५) दलित आत्मकथन हे दलित जाणिवेतून निर्माण झालेले एका नकाराचे व स्वीकाराचे जीवनविषयक साहित्य आहे.

१६) दलित आत्मकथने ही वर्ण आणि वर्गवादाच्या विरोधी वाङ्.मयीन आवाज उठवतात.

१७) दलित आत्मकथने माणसाच्या प्रगतीचा आलेख मांडतात. म्हणूनच त्यांच्या साठी समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय आणि प्रज्ञा, शील, करुणा या मानवी मूल्यांचा भरभक्कमपणे पुरस्कार करतात.

१८) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभ्या केलेल्या अस्पृश्यता निवारण चळवळीतील हा वाङ.मयीन पवित्रा आहे.

१९) या देशातील सामाजिक,आर्थिक,विषमता,दलितांवरील अन्याय अत्याचार दास्य दैन्य लाचारी, रुढीवाद, पंरपरा, देव, धर्म, चमत्कार, अंधश्रद्धा आदी माणसाचे व माणुसकीचे शत्रू आहेत. याचे चित्रण दलित आत्मकथनांच्यामध्ये दिसून येत.

२०) दलित आत्मकथने प्रामुख्याने समाजवादी, जीवनवादी, नीतिवादी, जडवादी भूमिका घेऊनच प्रकटतात.

२१) दलित आत्मकथनांच्या मधून प्रामुख्याने दलित समाजाला आत्मसन्मानातून आत्मशोध झाल्याचे चित्र दिसून येते.

२२) आत्मसन्माच्या मार्गात अडसर ठरणाऱ्या परंपरेला, रुढीला आणि रुढी परंपरा निर्मिणाऱ्या व्यवस्थेला दलित आत्मकथनांनी नकार दिला आहे.

२३) चार्तुवर्ण्यधिष्ठित व्यवस्थेविरुद्ध दलित आत्मकथनांनी नकाराची भूमिका घेतली आहे.

२४) परंपरावादी व्यवस्थेने माणुसपणा नाकारले याची वेदना दलित आत्मकथनांच्या मधून आविष्कृत होते.

२५) दलित आत्मकथनांमध्ये व्यक्त होणारी अनुभूती समुहाची असते.

२६) दलित आत्मकथने ही दलित चळवळीतून निर्माण झाली आहेत.

## ५. आत्मचरित्र व आत्मकथन यांची तुलना -

आधुनिक मराठीतील आत्मचरित्राला साधारणत: दीड शतकांची परंपरा आहे. त्या मानाने आत्मकथनपर लेखनाचे आयुष्य कमी मात्र हे खरे की, आत्मचरित्रे ही आयुष्याच्या मावळतीला लिहिली गेली आहेत. आपल्या पूर्वजीवनातील अनुभव व घटना नोंदण्याचा आत्मचरित्र हा एक प्रयत्न आहे. आयुष्याच्या एका विशिष्ट वळणावर गतेतिहास लिहिण्याची ही उर्मी मात्र पुष्कळदा लपंडाव खेळू लागली तर त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही कारण नाही. पुर्वायुष्यातील घटना त्यांचा क्रम, वास्तवता, संदर्भ आणि संस्कार गतजीवनाच्या इतिहासासंबंधी किती गडद व किती ठळक व किती अचूक असेल हा प्रश्न आहे. शेवटी स्मृतीवर भरवसा हाच एक पर्याय असल्यामुळे अनेक गफलती होण्याची ही शक्यता असते. एखाद्या घटनेची संगती लावण्याच्या प्रयत्नात विसंवादाचा प्रभाव ही घडण्याची शक्यता असते. आत्मसमर्थन आणि आत्मगौरव कधी कळत, कधी नकळत प्रविष्ट झाले

तर आत्मचरित्राची विश्वासार्हता धोक्यात येते. खरे तर आत्मचरित्रात व्यक्तीत्वाचा, कर्तृत्वाचा तो निर्लेपपणे घेतलेला सत्यपूर्ण इतिहास असतो. परंतु व्यंगावर पांघरुण घालण्याच्या सहज प्रकृतीमुळे मराठीतील अनेक आत्मचरित्रे एकदेशीय ठरली आहेत.

वस्तुतः आत्मचरित्रात लेखकाचा काळ, अपरिहार्यपणे प्रतिबिंबित होतो. आत्मकथनेही एखादा अपवाद वगळता आयुष्याच्या ऐन उमेदीत लिहिली गेली आहेत, लिहिली जात आहेत. तरूण अवस्थेत आपले जीवनानुभव कथन करणे याला गतीचा संदर्भ आहे. आयुष्याच्या उत्तरार्धातील आत्मचरित्रे आणि तारूण्याच्या उंबरठ्यावरील आत्मकथने ह्यात काळ हा जसा महत्त्वाचा घटक आहे. तसेच वृत्तिविशेषांचा ही घटक आहे. वृत्ती विशेषामुळे इतिहास आणि वर्तमान या दोहोंकडेही पाहण्याच्या दृष्टीत व त्यामुळे त्याचा व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीवर व त्यातूनच लेखनाचा आशय आणि अभिव्यक्ती यावर ही परिणाम होतो.वयाचा हा घटक दुर्लक्षून चालणार नाही. प्रौढत्व अधिक स्थिर व संयमी असू शकेल. पण तारूण्य आपल्या जीवनातील विसंवाद, विषमतेचे चटके लादलेली गुलामी अन्याय जुलूम या विरुद्ध तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करते एक प्रकारे बंडखोर मन त्यातून उसळी मारत असते. प्रतिक्रिया तीव्रतेने व्यक्त करते. पुष्कळदा संयमापेक्षा ते आक्रमक बनलेले असते.

आत्मचरित्रकार केवळ इतिहासाचे चित्रण करतो. तर आत्मकथनकर इतिहासाच्या पार्श्वभूमीवर वर्तमानाशी संवाद करीत असतो. वर्तमान घटना प्रतिपादन करीत असताना भविष्यासंबंधीची भाषिते ही त्याच्या

प्रतिपादनातून प्रकट होत असतात. कारण त्याचा वर्तमान घडत असतो. आणि पुढील आयुष्याचा प्रवास त्याच्या पुढ्यात असतो. आत्मचरित्रकार एक प्रकारे स्थिर जीवनाचे चित्रण करतो. आत्मकथनकाराचे नाते घडण्याच्या अवस्थेशी,गतीमानाशी असते. तो आपले जीवनानुभव कथन करीतच असतो. पुढेही करणार असतो त्यात अवरुद्धता नसते. प्रवाह असतो. आत्मचरित्रकार हे एखादाच अपवाद वगळता मध्यमवर्गीय जीवनाचे प्रतिनिधी आहेत, तसे आत्मकथनकाराच्या बाबतीत नाहीत. ते नाकारलेल्या समाजाचे प्रतिनिधी आहेत. वेगवेगळ्या अस्पृश्य जातीतून ते आले आहेत. त्यामुळे त्यांच्या अनुभव कथनातील दाहकता, वेगळेपण आणि जीवनाचे पदर भिन्नभिन्न आहेत. इतिहासाविषयीची दृष्टी मात्र समान आहे. आपला इतिहास हा आपल्या पूर्वजांना व आपल्याला तुडवणारा, आपले सर्वस्व हिरावून घेणारा, मनावर व शरीरावर आसूड ओढणारा म्हणूनच क्रूर व घृणास्पद आहे ह्याची त्याला जाणीव आहे. अन्याय,गुलामगिरी व दारिद्रय हे कृत्रिम रितीने आपल्या वर लादले होते. कधी धर्माचा आधार घेऊन तर कधी सनातनत्वाचा याची त्याला कल्पना आहे. हे सारे स्मृतीरुपाने त्याच्या मनात आहे. त्यामुळे आपल्या मनातील स्मृती तो पुसू शकत नाही. दास्याच्या इतिहासाचे गोडवे कोण गाईल ? हे दु:ख ताणतणाव स्वाभाविकपणेच त्याच्या अनुभवांचे रूप धारण करतात हा इतिहास तो नाकारतो. तो ह्यासाठीच हे सांस्कृतिक दु:ख, मानवी जीवनाचा अनावर उद्‌गार असल्यामुळे ते आत्मकथनाचे आशयद्रव्य ठरले आहे. पीडक आणि पीडित शोषक आणि शोषित यांच्यातील संबंधाचा तो भेदक सत्यार्थ आहे. तेव्हा दलित आत्मकथन सामाजिक, शैक्षणिक,

आर्थिक व सांस्कृतिक संदर्भाशिवाय असूच शकत नाही. तो त्याचा अविभाज्य भाग आहे हे निर्वीवाद.

दलित साहित्य या जीवनवादी साहित्याचा मौलिक अविष्कार म्हणून ज्या वास्तवाधिष्ठित वाड्.मय प्रकारचा उल्लेख केला जातो. त्या दलित आत्मकथनांचे स्वरुप आपल्या लक्षात येते. पारंपरिक चरित्र आणि आत्म-चरित्र या वाड्.मय प्रकारापेक्षा सर्वस्वी भिन्न अशी ही निर्मिती आहे. भारतीय समाजजीवनात, जातिव्यवस्थेच्या रुढी पंरपरेच्या चौकटीत होरपळून निघालेला माणूस, त्या माणसाचा समूह, त्याचे जगणे मरणे, समाज आणि संस्कृतीच्या परिघातील वर्तन व्यवहार ही आत्मकथने अभिव्यक्त करतात. आपण जगलेल्या भोगलेल्या गतायुष्याचे अनुभव उलघडून दाखविणे, दुसऱ्या समोर आपली जीवनानुभूती मांडणे यासाठी आत्मचरित्र आणि आत्मकथने लिहिली जातात. या दोन्हीमधून ही सत्यकथन, प्रांजळपणा, आत्मनिरीक्षण, आत्मनिवेदन आणि 'स्व' सोबत समूह दर्शन घडत असते. आपल्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना, प्रसंग आणि निवडक अन्वयार्थक अनुभव आत्मचरित्र आणि आत्मकथनामधून येत असते. दोन्हीमधून ही आत्मसमर्थनासाठी आणि आत्म अहंतेसाठी सत्याचा अपलाप होऊ नये हे अभिप्रेत आहे.[१]

आत्मचरित्र हे आयुष्याच्या संध्याकाळचे शेवटच्या टप्प्यावरचे लेखन असते. आत्मकथने लेखकांनी ऐन उमेदीच्या काळात लिहिली आहेत. त्यामुळे आत्मचरित्रामध्ये येणारा आयुष्याचा जीवनपट व्यापक असतो. आणि आता जगण्यासाठी फारसे काही नाही या भावनेने आत्मचरित्र अभिव्यक्त होते.

याउलट ऐन उमेदीच्या काळात दलित आत्मकथने येत असल्यानेआयुष्याच्या मध्यावरच लिहिली जातात. व्यापक जीवनपटाऐवजी त्याची कहाणी दु:ख भोगाची, वेदनेची आणि प्रश्नांची गुंतवळ असलेली कहाणी असते. दलित म्हणून सुरु केलेल्या आणि माणुसपणाच्या मुक्कावर पोहचलेल्या व्यक्तीचा आणि समाजाचा हा प्रवास असतो. आत्मकथनामधून समूहनिष्ठ मुक्तचिंतन ही अभिव्यक्त होते. या संदर्भात प्रा.रा.ग जाधव म्हणतात की, " एकाचवेळी आत्मदर्शन आणि समाजदर्शन, एकाच वेळी आत्मबोध आणि समाजसंघर्ष अशा सृजनशील द्वंद्वातून नावारुपास येणारी दलित आत्मकथने ही सूक्ष्म व सफल अभ्यास विषय आहेत. आत्मकथनांना कांहीएक घाट आहे. लक्षणीय असे साहित्य गुणही त्यात आहेत." आत्मचरित्रे गतायुष्यातील अनुभवांनी आणि संपन्न आयुष्याने भरलेली आहेत.पण आत्मकथने दु:ख भोगाने भरलेली आहेत. दु:ख, दारिद्रय आणि यातून आलेली वेदना याचे अनुभव विदारक सत्य सांगत आत्मकथने येतात. आत्मचरित्र आणि आत्मकथन यामधील भेद रेषेचे स्वरुप हे असे आहे.

आपण जे भोगले सोसले आणि असे असताना जगले या अनुभूतीला अभिव्यक्त केले. दलित आत्मकथनांच्यामध्ये याच अनुभव विश्वांचा प्रभावी अविष्कार आहे. आपल्याला वाट्याला जे बहिष्कृत जीवन आले त्या वेदना जन्मापासून भोगलेल्या सोसलेल्या असल्याने त्याचे अविष्करण दलित आत्मकथनामधून झाले आहे.अनंत प्रश्नामधून आपल्या भोवतालचे अस्वस्थ दु:खी जग परिवर्तनाच्या दिशेने जाते आहे. या समाजाचे चित्र दलित आत्म-कथनामधून येते. या संदर्भात प्रख्यात विचारवंत आणि दलित साहित्याचे

अभ्यासक डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात की, " कथन हे सातत्याचे प्रतीक आहे. तर कथेला शेवट असतो. ती पुर्णत्वाचा प्रत्यय देते. ती कुठे तरी थांबते आत्मकथनाचा प्रवास मात्र सुरुच असता. या दृष्टीने विचार करु जाता दलित आत्मकथन ही संज्ञा अधिक अर्थपूर्ण व अन्वर्थक वाटते." (१३) आत्मकथन लिहिणारा लेखक एकदाच अनुभव व्यक्त करतो असे नाही.

तर तो अजूनही आयुष्यात येणारे अनुभव आपल्या शब्दात मांडून वाचकांना सादर करत असतो.त्यामुळे एकदा सांगितल्यानंतर थांबणारी अशी ही क्रिया नाही तर हीचे कथन सततपणे चालू असते. त्यामुळे आत्मकथनाची ही प्रा. नलगे, डॉ. पानतावणे यांची व्याख्या योग्य वाटते. आत्मकथन व आत्मचरित्र याविषयी विश्लेषण करताना डॉ. वासुदेव मुलाटे यांनी म्हटले आहे की, "आत्मलेखनाचा बाह्य परिवेष वेगवेगळा असला तरी अंतरमनाच्या तडफेनेच त्यांचा अंतर्गाभा घडविलेला आहे. हे लक्षात घेणे अत्यंत महत्वाचे आहे. जे वेदनागर्भ आहे,ज्याचे स्मरण होऊ नये असे वाटते पण जे विसरताच येत नाही असे गतायुष्यातील व्यथांचे गाठोडे सतत उरावर घेऊन वावरणाऱ्या लेखकांची हीआत्मकथने होत आत्मचरित्रकारांची भूमिका गत आयुष्याकडे पाहण्याची,मागे वळून पाहण्याची असते. तर आत्मकथनामधील भूमिका अंतर्मनाच्या तडफेतून अंतरगाभा अभिव्यक्त करण्याची असते." (१४) आत्मचरित्रामधून आलेले इतिहासाचे रुप आत्मकथनामध्ये रहात नाही. तर विषनताधिष्ठित समाज व्यवस्थेमुळे पिचुन गेलेल्या, आर्थिक शोषण झालेल्या आणि संस्कृतीच्या नावाखाली दास्यत्व लादलेल्या समाजाला

शिक्षणाने नवे भान आले. आत्मकथन आलेले हे युवक समाजाच्या प्रत्येक घटकाच्या आत्मसन्मानासाठी संघर्ष सुरु करीत आहेत. दलित साहित्यातील आत्मपर लेखनाचे स्वरुपाचे आत्मकथनपर झालेले लेखन त्यामुळेच आत्म-चरित्रापेक्षा वेगळे आहे.

प्रा. वा. ल. कुलकर्णी यांनी आत्मकथन आणि आत्मचरित्र यातील भेदरेषा स्पष्ट करताना असे म्हटले आहे की, " जीवनाच्या साधारण अर्ध्या टप्प्यावर येतो. जे जीवन आपण आजपर्यंत जगलो, त्याकडे प्रश्नांकित मुद्रेने वळून पहाणारा आत्मचरित्रकार आणि शेवटच्या दिवसात आपल्या जीवनाचे सिंहावलोकन करु पहाणारा पूर्वीचा आत्मचरित्रकार यांच्या वृत्तीत फरक आहे. जीवनाचा निरोप घेताना शेवटची निरवा -निरव करुन आणि आपल्या आयुष्याचा जमाखर्च सादर करुन एकजण जातो. तर दुसरा जीवनाच्या ऐन मध्यावर थांबून आपण आजपर्यंत जो प्रवास केला. त्याकडे डोळे भरुन पहाण्याचा व त्याव्दारा 'आपण खरोखर कोण आहोत ? हे पुढील प्रवासाच्या दृष्टीने जाणून घेण्याचा प्रयत्न करीत असतो. म्हणूनच ही नवीन आत्मचरित्रे अधिक प्रामाणिक जीवनाचे यथार्थ दर्शन घडवू पाहणारी अशी ठरत आहेत."[१५] यातून प्रा. वा. ल. कुलकर्णी रुढार्थाने येणारी आत्मचरित्रे आणि दलित आत्मकथने यातील वेगळेपण स्पष्ट करतात. दलित आत्मकथनामधून न संपलेली सातत्याने चालणाऱ्या जीवनाची दु:खाची गाथा व्यक्त होत असते. हे स्पष्टच आहे. दलित आत्मकथनातील काही अनुभव हे लेखकाच्या कुटुंबाचे, जातीचे तर कांही अनुभव लेखकाच्या समाजाचे किंवा समाज घटकाचे असू शकतात. कारण त्याला केवळ त्याच्या वैयक्तिक पातळीवरचे दु:ख भोग किंवा

अनुभव सांगायचे नसतात. तर त्याच्या एकूण समाजाच्या जाणिवा व्यक्त करावयाच्या असतात. स्वत:च्या आयुष्याची दु:खद गाथा सांगून त्याला स्वत:विषयी वाचकांची सहानुभूती मिळवायची नसते. तर ज्यांनी हे भोगले, ज्यांच्या वाट्याला दु:ख भोग आहे, ज्यांचे शोषण झाले, होते आहे त्यांना जागृत करावयाचे असते. नव्या पिढीच्या जीवनात तरी ते घडू नये. म्हणून विद्रोहाची आग पेटवायची असते. त्याच बरोबर हे कुणी, ज्यांचा समाज, ज्यांचे पूर्वज दलितांच्या या दु:ख भोगाला कारणीभूत ठरले असतील त्यांनी ही अंतर्मूख व्हावे. असा या आत्मकथनांचा हेतू आहे.

'दलित आत्मकथन' म्हणजे 'आत्मचरित्र' ह्या वाड्.मय प्रकाराचा नवा अवतार नव्हे किंवा आत्मचरित्राची ती विकसित अवस्थासुद्धा नव्हे. आत्मचरित्र आणि आत्मकथा ह्यातील फरक सहजपणे सांगता यावा एवढे हे वाड्.मय प्रकार परस्परांपासून वेगळे आहेत. आत्मचरित्राचा लेखक हा आपल्या कर्तृत्वाचा बहर ओसरल्यानंतर आपल्या कार्याचा मागोवा घेतो. तर आत्मकथा लिहिणारे एक दोन अपवाद वजा जाता सर्व लेखक अतिशय तरूण वीस ते तीस ह्या वयोगटातले आहेत. आत्मचरित्राचे नायक जीवनातल्या कुठल्या क्षेत्रात लक्षणीय कामगिरी करणारे असतात. त्यामुळे त्यांची आत्मचरित्रे त्यांच्या जडणघडणीचे चित्र वाचकांसमोर सादर करतात. तर आत्मकथनाचे लेखक जीवनातल्या कुठल्याच क्षेत्रात असाधारण कर्तृत्व गाजवणारे नसतात. ते ज्या स्तरातून पुढे येतात त्या स्तराचे मागासलेपणाच एवढे की अशा आत्मकथनकाराचे शिक्षण घेणे आणि सन्मानाने जगता यावे यासाठी एखादी साधी नोकरी मिळविणे हेच त्यांच्या दृष्टीने फार मोठे कर्तुत्व

असते त्यामुळे त्यांची आत्मकथा ही त्यांच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण कशी झाली हे सांगत सांगत आपल्या जातीची कथा सांगते. त्यामुळे दलित आत्मकथा पर्यायाने त्या त्या लेखकांच्या जातीची समाजकथा असते. आत्म-चरित्रात नकळतपणे का होईना स्वसमर्थनाचा दोष येतो. आत्मकथाकार असे स्वत:चे कुठलेच समर्थन करीत नाही. कारण त्यांची लेखनाची प्रेरणाच आपले दु:ख सांगून आपल्या मनावरचा भार हलका करावा ही आहे.

ज्या व्यवस्थेमुळे आपल्या वाट्याला हे दु:ख आले त्या व्यवस्थेवर बोट ठेवावे, ती व्यवस्था बदलली पाहिजे. असा ध्यास धरावा हीच विनंती आत्मकथनकारांची प्रेरणा आहे, जे दु:ख आपल्या वाट्याला आले ते निदान आपल्या पुढच्या पिढीच्या वाट्याला तरी येऊ नये असा एक उत्कट आशावाद दलित आत्मकथनाच्या लेखकाच्या मनात असतो. हे सर्व प्रेरणात्मक विशेष आत्मचरित्रापेक्षा वेगळे आहेत. त्यामुळे दलित आत्मकथा म्हणजे आत्मचरित्र ह्या वाड्.मय प्रकाराचे विकसित रूप होय असे म्हणता येत नाही.

दलित आत्मकथने ही ललित वाड.मयाचाच एक प्रकार आहे. आत्म-चरित्राचे तसे नाही. अनेक आत्मचरित्रे शास्त्रीय आणि ललित लेखन ह्यांच्या सीमेवर वावरताना आढळून येतात. त्यामुळे फार कमी आत्मचरित्र आपणाला कलात्मक यश मिळविण्यात सफल झाली आहेत. असे म्हणता येते. दलित आत्मकथन आपली वेदना शब्दात प्रकट करावी याच हेतूने जन्म पावतात. कल्पना विलासाला फारसा वाव नसल्यामुळे आत्मकथनातले लेखन सहज पणे वाचकाच्या हृद्यास भिडते. कसोट्या कोणत्याही वापरल्या तरी दलित

आत्मकथने कलात्मक दृष्ट्या सरसच आहेत, असे आढळून येते. म्हणूनच भारतीय आणि जागतिक पातळीवरचे सन्मान ह्याच वाड.मय प्रकारातील लेखनाला मिळाले आहेत.

## ६. दलित आत्मकथनांच्या आशयाचे स्वरुप

दलित आत्मकथनामधून आत्मकथनकाराची स्वत:ची जडण-घडण अभिव्यक्त होते. त्याच बरोबर सामाजिक आशय हा या आत्मकथनांचा गाभा आहे.आत्मकथनातील 'मी' प्रतिनिधित्व स्वरुपाचा आणि व्यक्तीगतजाणिवांनी युक्त असा आहे. हा 'मी'आपल्या वर्तमान जगण्याला कारणीभूत असलेल्या भूतकाळाचा वेध घेत वर्तमान सांगतो आहे ते या साहित्यरुपाच्या आशयाच्या अभिव्यक्ती मुळेच आणि हा आशय भारतीय समाज व्यवस्थेच्यावर्तन व्यवहाराला अभिव्यक्त करणारा आशय आहे. जे घडले ते जसेच्या तसे मांडणे ही सर्वच आत्मकथनकारांची भूमिका असल्यामुळे या जगण्या भोगण्याचा आशय ही आत्मकथने व्यक्त करतात.

प्रत्येक दलित आत्मकथनांचा, जीवनाशय हा त्या त्या समाजाच्या जीवन धारणांची अभिव्यक्ती करतो.दलित आत्मकथनांची शीर्षके जरी लक्षात घेतली तरी या जीवन धारणांचा आशय या शीर्षकातून कला अभिव्यक्त होतो. हे लक्षात येते. ही शीर्षके या समाज वास्तवालाच अविष्कृत करतात. जात, अस्पृश्यतेचे, या आशयाचा केंद्रबिंदू आहे. या आत्मकथनामधून समाज-जीवनाचा व्यापक जीवनपट व्यक्त होतो. या आत्मकथनांचा आशय वास्वदर्शी भाषेतून व्यक्त होतो. या प्रत्येक आत्मकथनाची भाषा सामाजिकतेशी निगडीत आहे. प्रत्येक दलित आत्मकथनात अनेक वर्षाची वेदना जातीव्यवस्थेविरुद्धचा

विद्रोह आणि जिर्ण रुढी, प्रश्न परंपराचा नकार प्रामुख्याने दिसतो याचबरोबर आत्मभान, मानवी मुल्यनिष्ट, विज्ञाननिष्ठ इ. गुण दिसतात.

## ६.१ दलित आत्मकथनातील समाजविषयक जाणीव :-

दलित आत्मकथनांमधून आत्मकथनकाराच्या समाजाचे चित्रण येते. मी या समाजात जन्मलो म्हणून हे दु:ख भोग व्यथा-वेदना माझ्या वाट्याला आल्या अशीच त्यांची भावना किंवा व्यथा असते. 'तराळ-अंतराळ' मध्ये शंकरराव खरात महारांच्या मृत जनावराचे मांस खाण्याबद्दलचा अनुभव म्हणून स्वत:च्या व वडिलांच्या अनुषंगाने लिहितात, " हे असं मेलेल्या जनावरांचे मांस खाण्याचा म्हारांवर माझ्या वडिलांवर, माझ्यावर तरी प्रसंग का आला ? त्याचं उत्तर म्हणजे मी माझ्या वडीलांच्या पोटी, महारांच्या पोटी जन्माला आलो म्हणून आणि पुन्हा त्याकाळी हे ध्यानात ठेवा, तुम्हीही माझ्या सारखे म्हारजातीच्या पोटी जन्माला आला असता तर तुम्हालाही या सगळ्या मेलेल्या जनावरांच मांस गाडग्यात शिजवुन खाण्यास प्रसंग आला असता."[(१६)] अशा पध्दतीने समाजविषयक जाणीव शंकरराव खरातांनी व्यक्त केलेली आहे. याच पद्धतीचे वर्णन बेबी कांबळे यांनी 'जिणं आमुचं' मध्ये केलेल आहे. "बरम्यानी महाराच्या पोराकरीता शिक्काच केला असावा. धरला शिक्का, उठव कपाळावर धर शिक्का मार कपाळावर महाराच्या पोराकडून असं काय आगळ-वेगळ घडायच होतं. म्हणून सटवी बरम्यानी आमच्यावर शिक्के उठवण्याची घाई घेतली. आणि एकच नशीब त्यांनी सगळ्या जगातील महारांच ठरवलं."[(१७)] हे वर्णन समाजविषयक जाणीव म्हणून येते. अशा

समाजविषयक जाणींवा व्यक्त करणारी वाक्ये आणि घटना-प्रसंग कमी अधिक प्रमाणात सर्वच दलित आत्मकथनामधून आढळतात. यातून लेखकाची समाजाविषयीची तळमळ दिसून येते.

## ६.२ दलित आत्मकथनातील समाजचित्रे

दलित आत्मकथनांच्यामधून समाज जीवनाचे चित्रण येणे स्वाभाविक आहे. कारण आत्मकथन करणाऱ्या लेखकाच्या अनुभवाचे अनेक संदर्भ समाजाशी निगडीत असतात. म्हणून कमी-अधिक प्रमाणात सर्वच दलित लेखकांच्या आत्मकथनांमधून त्या त्या लेखकाच्या समाज जीवनाचे तपशील येतात. हे तपशील कधी समाजाच्या आर्थिक विषमतेसंबंधी असतात. तर कधी धर्माधिष्ठित व सामाजिक परंपरा स्पष्ट करणारे असतात. यात आचार-विचार, रुढी, श्रद्धा-अंधश्रद्धा, रीतिरिवाज त्यांचे स्वरुप यांच्या विषयी ही माहिती असते. 'बलुत' मध्ये महारकीच्या कामाचा तपशील दया पवार देतात.

' उचल्या ' मध्ये व 'बेरड' मध्ये ही अशाच पद्धतीची वर्णने येतात. 'मुक्काम-पोस्ट देवाचे गोठणे' मध्ये हरीची बायको रात्री दुसऱ्याकडे जात असता तिला भूत झपाटते व तिच्यावर उपाय म्हणून उडीद-नारळ-अंडी उतरुन टाकतात. जर एखाद्याचे लग्न होत नसेल तर चांभार समाजातील लोक भगताकडं जाऊन अंगारा धुपारा करवून घेतला म्हणजे ठरते असा समज आहे ही अंध:श्रद्धेचीच उदाहरणे होत. त्याचप्रमाणे या आत्मकथनात गौरीच्या सणाचे वर्णन येते. कारण गौरीचा सण म्हणजे त्यांच्या दृष्टीने अपुर्वाईच ह्या सणाला लाकडाच्या खांबावर गौरीचा मुकुट बांधला जातो. फुलांचे हार घातले जातात. गौरीला साडी-चोळी नेसवली जाते आणि घरातील दाग-

दागिने तिला चढवले जातात, तांदळाने गौरीची ओटी भरुन मग तिला मनात असलेले मागणे मागितले जाते. व मटणाचा आणि दारुचा नैवैद्य दाखवला जातो. 'गबाळ' मध्ये भविष्य सांगणाऱ्या कुडमडे जोशाच्या पोषाखाचे आणि त्याच्या व्यवसायाचे चित्रण आलेले आहे. तसेच लग्न व व्होरीच्या वेळच्या मानपानाचे वर्णनही आलेले आहे. तर आयदान मध्ये लेखिकेचे वडील भुतबाधा झालेल्या लोकांना ठिक करताना दिसतात. तसेच लेखिकेच्या समाजातील अनेक लोक अंध:श्रद्धेला बळी पडून अनेक वाईट कृत्य केल्याचे वर्णन येते.

## ६.३ दलित आत्मकथनातील भुकेचे चित्रण

दलितांच्या अभावग्रस्त जीवनात भूक ही रौद्र स्वरुपात आढळते. म्हणून दलित आत्मकथनांच्या मधून ही भूकेसाठी दलितांना कराव्या लागणाऱ्या जीवन संघर्षाची चित्रे मोठ्या प्रमाणात रेखाटलेली आढळतात.

लक्ष्मण माने 'उपरा' मध्ये लिहितात, " दार उघडताना लहानपण डोळ्यापुढून सरकत होतं लोक जेवून उठले की, पत्रावळ्यावर तुटून पडायच मनात आलं काय हरकत आहे. पण शैशी,सांगाव कसं? तिला न विचारताच बाहेर पडलो. भराभर लग्नमंडपाजवळ गेलो, तर सारे आव भाई |खाना खाव| म्हणून एकमेकाला म्हणत होते. आणि एकाच परातीत मावतील तेवढेजण बसत होते. माझ्या डोक्यात प्रकाश पडला. आयला ही मुसलमान आपल्या सारखी पत्रावळ्यावर जेवत नाहीत. घरी आलो,तांब्याभर पाणी प्यालो." [३८]

अस हे भूकेच्या रौद्र रुपाला दलित तोंड देतात. काट्यावरची पोटं मधील आक्का भाकरीसाठी उत्तम बरोबर मांडते. औंधला शिकायला गेलेल्या

खरातांना कुत्र्याने कुरतडलेल्या भाकरीचंका होईना गाठोडं परत मिळालं याचा आनंद होतो. निवडुंगाची बोंड खाल्यानंतरच वर्णन बेबी कांबळे 'जिणं आमचं' मध्ये करतात, "सकाळी उठून परसाकडं जायला बोंड खाणारी माणसं अगदी चळाचळा कापत. सकाळपासून दुपारपर्यंत कुथत बसली तरी एखाद्या वेळी कूथून कूथून डोळे बाहेर पडतील पण तो तुंबडा काय बाहेर येणार नाही."[१९] शरणकुमार लिंबाळे त्यांचा अनुभव सांगतात, "संतामाय वटीत भाकरी घिऊन येयाची म्या आनंदानं हरकुन जायचो. संतामाय, हळुहळु येयाची मला वाटायचं संतामाय पळत का येत न्हाय, संतामाय माझ्यापढी वाटी करायची. कुण्या माय माऊलीनं जेवणखानं करुन उरलंसुरलेलं वाढलेल असायच. भाकरीचे कुटके, पिठलं, लोणचं बगून तोंडाला पाणी सुटायचं. म्या हावऱ्या वाणी खायाचो अन्न अमृतावानी वाटायाचं संतामायाची वटी सर्गावानी वाटायची."[२०] अशी ही भूकेची भयानकता दलितांना छळते. एवढी ही भूक भयावह आहे अन्नासाठी वखवखलेल्या दिशाहिन अवस्थेत भरकटणाऱ्या माणसांची ही कुत्तर ओढ एवढ्या मोठ्या प्रमाणात मराठी साहित्यात प्रथमच अवतरली आहे.

## ६.४ दलित आत्मकथनातील अस्पृश्यतेचे चित्रण :-

चातुवर्णावर आधारित समाज व्यवस्थेत अति शुद्रांना अस्पृश्य मानले त्यांच्या सावलीचा ही स्पर्श उच्चवर्णियांना चालत नव्हता. माणसाने माणसाचा स्पर्श नाकारावा ही केवढी अमानुष कल्पना पण तिच्या मुळेच दलितांची जीवने करपून गेली. चोखामेळा, कर्ममेळा यासारख्या संतांनीही

आपले याबाबतचे दु:ख अभंगामधून मांडलेले आहे. अस्पृश्यतेमुळे भोगलेल्या दु:खाचे अनुभव त्यांच्या लेखनातून वेगवेगळ्या प्रसंगाच्या माध्यमातून चित्रीत झालेले आहेत. आत्मकथनकारांनी अस्पृश्यताविषयक अनुभव चित्रणाचा प्रारंभ बहुतेक शालेय जीवनातील अनुभवापासून झालेला आहे. प्राथमिक शाळेसारख्या ठिकाणी येणारे अस्पृश्यता विषयक अनुभव बहुतेक लेखकांनी वर्णन केले आहेत.

'आक्करमाशी' मध्ये शरणकुमार लिंबाळे शालेय जीवनातील अनुभव सांगतात,'' जवा शाळा मारवाड्याच्या वाड्यात असायची, तवा आमी खाली बसायचो मास्तर ढेल्जत बसून गावातल्या पोरांना गणित समजून सांगायचा आमी खाली जोड्याजवळ भवताली चपला सोडलेल्या.'' [(२१)] अशी अस्पृश्यता विविध प्रसंगातून व्यक्त होते.'माज्या जल्माची चित्तरकथा'मध्ये बांगड्या भरताना विटाळ होतो. म्हणून कासारीन घोंगडी नेसते. विहिर भरायला नकार देते.

'' आता झालीया रात, या अंदारात तुला कुटं घालवु घरात ये, आनिक त्या बैलाच्या पडयाल तिक (तिडे) बस'' मला गुरांच्या गोठ्यात बसवून नारु पाटील घरात जात जात म्हणतो कसा,''हिची भन ss काय तरीच बैदा एकादा चांगला मास्तर न्हाय दिया आला सरकारला ? ह्यो म्हार कशाला दिलाय आमास्नी ?.'' [(२२)] 'मु. पो. देवाचे गोठणे' मध्ये माधव कोंडविलकर सोमणवाडी गावचा अनुभव कथन करतात. त्यांच्या तेथील शाळेतील त्यांच्या वर्गातील मुलं शाळा सुटल्यावर आंघोळ करायला जात. कारण शाळेत चांभार मास्तराचा विटाळ सवर्ण मुलांना झालेला असतो. ' आठवणीचे पक्षी ' मध्ये

ही काही प्रसंग आहेत. लहानगा प्रल्हाद एका बहिणीच्या गावाहून दुसऱ्या बहिणीच्या गावी जाताना एकाओढ्यातल्या चेलम्याचे (खड्ड्यातील) पाणी पीत होता. वास्तविक तेथील पाणी सवर्णांची गुरे पीत असत.पण प्रल्हादला पाणी पिलेले पाहिल्यावर एक शेतकरी धमकावतो. हुरडा खायला गेले असताना इतरांबरोबर प्रल्हाद घोंगडीवर बसल्याचे हुरडा भाजुन देणाऱ्या माळ्याला आवडत नाही. तो प्रल्हादावर डोळे वटारतो. नाक मुरडतो आणि म्हणतो ''दिवाणजी साहेब तुम्ही काही म्हणा हा परल्या काई शिकला तर उत्तीम. लोकांच्यावर पंगतीला बसणं बर नाही. त्याला हे घातक है कारण त्याने आपल्या पायरीनेच वागावं.'' [२३] अशी ही अस्पृश्यता जागोजागी दलितांना छळत असते.

## ६.५ दलित आत्मकथनातील व्यक्तिरेखा

दलित आत्मकथनात 'मी' हा केंद्रस्थानी असतो. परंतु तो त्याच्या आयुष्यातील घटना-प्रसंग सांगत असताना त्याच्या कथनात इतरही आप्त - मित्र किंवा अन्य निमित्ताने आलेल्या व्यक्तीचे उल्लेख येणे स्वाभाविक आहे. या व्यक्तीसंबंधी मुद्दामहून काही सांगितलेले नसते, तरी आत्मकथनकारा बरोबरच त्या कधी कधी वाचकांचे लक्ष वेधून घेतात.'बलुत' मध्ये भेटणाऱ्या सर्व स्त्रिया या टोकाच्या सहनशिल असलेल्या आपल्याला दिसून येतात. 'अंत:स्फोट' मध्ये नवऱ्यापासून वेगळ्या झाल्या तरी सावित्रीव्रत करणाऱ्या मायबाई, आपल्या आवडीच्याच परंतु जाती बाहेरच्या मुलाशी लग्न करणारी सुनिता, जात न मानणारी, दलितांतील जाती तुटाव्यात म्हणणारी नंदीश्वर आजी इ. व्यक्ती लक्षात राहतात. या त्यांच्या धाडसी निर्णयामुळे.

'उचल्या' मधील लेखकाचे वडील मारतंडबाबा चोरी करण्याचे प्रशिक्षण देणारे संतराम भाऊजी, माणिकदादा, भगवान अण्णा, संबाभाऊ, हरचंद्रा, सायबुताता, प्रेम करणारी शोभा, बिनधास्त स्वभावाची एलाप्पा इ. व्यक्ती त्यांच्या विविध काहीशा अफलातुन वैशिष्ट्यामुळेच लक्षात राहतात.

'आयदान' मधील लेखिकेचे वडील, तिची आई तसेच हरिश्चंद्र ह्या व्यक्तीरेखा त्यांच्या गुण वैशिष्ट्यामुळे लक्षात राहतात.

दलित आत्मकथनांमधून येणारी काही माणसे ही व्यसनी, चैनी, त्रागा करणारी दुष्टावा करणारी आहेत. तर बहुतेक माणसे ही गरीबीत, संकटात घुसळून निघणारी, तरी ही माणुसकी जपणारी, परस्परांवर कावणारी तरी प्रेम करणारी अशी आहेत. रागीट धाडसी आणि प्रामाणिक अशी ही आहेत.आपले संचित आपण जपले पाहिजे, भोग भोगले पाहिजेत असे त्यांना वाटते. रंगेल आणि उद्याम माणसे येथे अभावानेच आढळतात.

## ६.६ दलित आत्मकथनातील स्त्री जीवन :-

दलितांना प्रस्थापित समाजव्यवस्थेने शुद्र लेखुन त्यांच्यावर अनन्वित अत्याचार केले. स्त्री म्हणजे तर पायाची दासीच. दलितांहून दलित, शोषित, भरडली जाणारी पिळली जाणारी स्त्री आहे. दलित आत्मकथनांच्यामधून येणारी स्त्री सतत राबणारी नवऱ्याच्या सुखात सुख माणनारी आहोरात्र त्याची सावलीसारखी सोबत करणारी स्त्री आहे. त्याची त्याच्या मुलाबाळांची, फुटक्या-तुटक्या संसाराची काळजी करणारी,त्याला जपणारी सोशिक मनाची ती स्त्री आहे. ती पुरुषाच्या बरोबरीने राबते. कधी तर जास्तच राबते. स्वत: काम करुन झिजुन त्याला ती हिंमतीने उभी करते. घरातील कर्ताधर्ता पुरुष

व्यसनी असेल, आळसी असेल, वेंधळा, नादान असेल तर तीच पुढाकार घेऊन संसाराचा गाडा रेटते. आणि स्वत:ची काळजी न घेता घरातल्या सर्वांची घेते. नवऱ्याच्या माघारी वैधव्य प्राप्त झाल्यावर ही ती कर्ती होऊन खंबीरपणे उभी राहते. 'बलुत' मध्ये नवरा दारुबाज व बाहेरख्याली असून ही दया पवारांच्या आईने त्याला साथ दिली. नवरा मेल्यावर ही तिने हिंमतीने आणि कष्टाने आपल्या मुलांना वाढविले. आयुष्यभर काडीचही सुख न लाभले ली लेखकाची आजी. एकेकाळी खुप सुंदर असणाऱ्या बाणुला तिचा नवरा सोडून देतो. विठाबाई ही चक्क गरोदरपणाचे नाटक करते. अशा पद्धतीने 'बलुत' मधील या सगळ्याच स्त्रिया विविध स्तरावरच्या व्यथा, वेदना, यातना सहज भोगत जगणाऱ्या आहेत. अशाच पद्धतीने लक्ष्मण मानेंच्या उपरामध्ये चित्रीत झालेल्या स्त्रिया आयुष्यभर कष्ट उपसुन, काडीचीही किंमत नसताना मरतात.

चंदामायला मुलंच झालं नाही, आणि संतामायला एकच मुलं झालं म्हणून नवऱ्याने सोडलं. नवऱ्याने सोडले तरी संतामाय विलक्षण धार्मिक वृत्तीची आहे. ती उपास-तापास करते. गळ्यात कवड्याची माळ घालुन परडी घेऊन जोगवा मागते. 'आक्करमाशी' मध्ये आणखी ही काही स्त्रिया भेटतात.

अशाच पद्धतीने जिणं आमुच, अंत:स्फोट, आयदान इ.आत्मकथना-तून येणाऱ्या सगळ्या स्त्रिया स्वत: जीवनातले हलाहल पचवून पुरुषांना खंबीरपणे आधार देणाऱ्या आहेत. आधीच दलितांचे जीवन कष्टमय, यातनामय, दु:ख भोगी त्यात ही दलित स्त्रीच दु:ख अधिक तीव्र आहे.

## ६.७ दलित आत्मकथनातून येणारे ग्रामीण जीवन :-

बहुतेक दलित आत्मकथनकार हे खेड्यातच जन्मलेले असल्याने आणि त्यांच्या जीवनाचा सुरवातीचा फार मोठा कालखंड हा खेड्यात गेलेला असल्याने त्यांच्या अनुभव कथनामधून ग्रामीण जीवनाचे संदर्भ येतात.

'उपरा' मध्ये गावाचे वर्णन पुढीलप्रमाणे येते. '' निरगुडी आमचं गाव. फलटन पासनं पाच-सहा मैल बऱ्यापैकी खेड गावाच्या खाल्ली, कडनं वडा वहातो.तसा तो फक्त पावसाळ्यात वहायचा येरवी कोरडा गावात सातवीपोतुर शाळा, म्हार, मांग, व्हल्गार, कैकाडी, धनगर, सोनार ह्यांची चार-दोन घरं, बाकी सारा गाव मराठ्यांचा घर टोलेजंग, मोठे मोठे वाडं गाव लई जुनं......... वळानबी जुनं पाटलाच्या वाड्याच्या डाव्या हाताला कैकाडवाडा,त्याच्या म्होरं शाळा, शाळं म्होर दंड्या लिंबाचं झाड , गावं पांढरी बागायती.... ऊसाच मळं फुलल्यालं,केळी, ज्वारी मुख्य पिक, ऊसाची हिरवीगार शेतं मंजी तर गावांची दौलत |'' [२४] अशी गावाची वर्णन येताना दिसतात. ग्राम जीवनात पाळल्या जाणारी अस्पृश्यता, तेथील रीति-रिवाज, जाती - जातीच्या मध्ये होणारी भांडणे, जातपंचायतीमधून होणारे न्याय निवाडे, पाटील - सरपंच यांची गावावरील हुकूमत इ. चे या आत्मकथनामधून कमी अधिक प्रमाणात दर्शन घडते.

## ६.८ दलित आत्मकथनातील भाषा आणि निवेदन :-

या आत्मकथनांच्यामधून केलेल्या निवेदनावर लेखकाने वापरलेल्या भाषेचा परिणाम असतो. लेखक निवेदनासाठी जी भाषा वापरतो तिच्यावर

समाज,काल, स्थळ यांचा परिणाम असतो. म्हणूनच दलित आत्मकथनातील भाषा लेखक ज्या भौगोलिक परिसरात,ज्या समाज स्तरातून, आलेला आहे समाज घटकात राहतो. त्यावर अवलंबून आहे. याशिवाय वाढत्या वयानुसार बौध्दीक विकासानुसार त्या त्या लेखकाची मुळची भाषा बोलू शकते. जवळपास सर्वच लेखकांनी ज्यांनी विशेषत: बालपणापासून आपले अनुभव कथन केले आहेत. त्यांनी,वापरलेली ग्रामिण बोली व त्याच्या समाज जीवनातील स्तरातील भाषा हळूहळू वयपरत्वे, परिस्थिती परत्वे बदलत नेली आहे. व शेवटी ती नागरी किंवा प्रमाण भाषेत रुपांतरीत झालेली आहे.

लेखक ज्या जीवनाच्या क्षेत्रातील स्तरातील अनुभव प्रकट करीत असतो. त्या क्षेत्रातील स्तरातील भाषा किंवा बोली त्याच्या लेखनातून अवतरत असते. आणि हे आवश्यक व अपरिहार्य ही असते. कारण त्याशिवाय चित्रीत करावयाच्या जीवनानुभवाचा प्रत्यय सर्वार्थाने येणारच नाही. गावातील आणि तळातल्या समाजातील माणसांची भाषा ही त्याच गावातील मध्यम वर्गीय किंवा उच्च समाजातील माणसांच्यापेक्षा वेगळी असते. त्यातील फरक शोधणे अवघड असते. सवयी,वळणे, रुढी आणि परंपरा यांचाही या संदर्भात विचार करावा लागतो. अनेकदा घरात बोलली जाणारी भाषा घराबाहेर व्यवहारात बदलली जाते. माणूस ज्या जाती-जमातीचा प्रतिनिधी असतो. त्या जाती-जमातीच्या भाषेचा संस्कार त्याच्यावर होत असतो.

निवेदनातील भाषेवर लेखकाच्या स्वभाव वृत्तीचाही परिणाम होतो. त्यातून त्याची लेखनशैलीही निर्माण होते. या आत्मकथनातील भाषेमुळे मराठीच्या शब्दसंग्रहात फार मोठी भर पडली आहे. दलित जीवनातील

वाक्प्रचार, म्हणी आणि शिव्या यांनी मराठीच्या वैभवात वृद्धीच झाली आहे. विविध बोलींचे ऐश्वर्य ही प्रयत्नाला आले आहे.

## ७. दलित आत्मकथनांची वाटचाल :-

कोणताही वाड्.मय प्रकार हा एकाएकी रुढ होत नाही. दलित आत्मकथनाबद्दलही असेच म्हणता येईल. १९४८ साली विठ्ठल बाबाजी पालवणकर ऊर्फ पी. विठ्ठल यांचे 'क्रिडा जीवन' या नावाचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. क्रिकेटपटु म्हणून त्यांनी आयुष्यात केलेल्या कामगिरीबद्दल त्यात त्यांनी प्रामुख्याने लिहिले आहे. ते दलित असल्याने काही जीवनामुख दलितासंबंधी भाष्ये करणारी आहेत. परंतु ते एकूण दलितांच्या जीवनाचे प्रतिनिधिक चित्र उभे करणारे नाही. मुख्य म्हणजे दलित आत्मकथनकारांच्या लेखनात असावी लागणारी दलितत्त्वाची जाणीव त्यांच्या लेखनात दिसत नाही.

थोड्या फार फरकाने हेच १९७५ साली प्रसिद्ध झालेल्या स. ना. सुर्यवंशी यांच्या 'आगा जे कल्पिले नाही', या आत्मचरित्राबद्दल म्हणता येईल पुर्वाश्रमीच्या महार जातीतील सुर्यवंशी यांनी ख्रिश्चन असूनही हिंदु समाज त्यानां महारांप्रमाणेच वागणुक देतो. असा तक्रारीचा सुर मांडलेला आहे.

खऱ्या अर्थाने दलित आत्मकथनांची बीजे एका महाविद्यालयाच्या वार्षिक अंकात सापडतात. तो वार्षिकांक म्हणजे मिलिंद महाविद्यालय, औरंगाबादचा वार्षिकांक १९६४ च्या वार्षिकांकामध्ये प्र.ई. सोनकांबळे यांचा 'वाटाड्या' या शीर्षकाचा एक आत्मकथनपर लेख प्रसिद्ध झाला आहे. हा लेख म्हणजे दलितांच्या आत्मकथनपर, लेखनाची सुरवात म्हणायला हरकत

नाही. मात्र 'आठवणीचे पक्षी' ग्रंथरुपाने येण्याच्या साधारणत: महिनाभर आधी दया पवार यांचे 'बलुत' प्रसिद्ध झाले. त्याची खुप चर्चा झाली.

दलितांच्या जीवनाचे डॉ. आंबेडकराच्या चळवळीने सम्यक परिवर्तना साठीचे मानसिक संवर्धन केले. त्यातून त्यांच्या जीवनात परिवर्तन आले. सामाजिक, सांस्कृतिक,शैक्षणिक जीवनात कमालीचा बदल झाला. भूतकाळा तील भोगलेलं जीवन आणि वर्तमानात बदलणारे जीवन याचा आलेख दलित आत्मकथनांनी चितारला आहे. याचा आणखी एक विशेष असा आहे की, महार, मातंग, चांभार, ढोर, कैकाडी, कुडमुडे जोशी, उचल्या बंजारा, बेरड, गोपाळ, लोहार, न्हावी,कोल्हाटी अशा नानाविविध दलित जाती-जमातीमधून आत्मकथने लिहिली गेली. या प्रत्येक जाती-जमातीच्या दु:खाची जातकुळी निराळी आहे. कारण त्यांच जीवनच वेगळं आहे. हे सारं अस्वस्थ करुण सोडणारं, थक्क करुन सोडणार जीवन या आत्मकथनांमधून आलं आहे. विविध जाती-जमातीमधील लोकजीवन जगण्यासाठी चाललेली त्यांची धडपड, त्यांच्या जीवनावर असलेल्या अंधश्रद्धा, रुढी, परंपरा यांचा पगडा, समाजातील लोकांमधील दारुचे व्यसन बाहेरख्यालीपणा सारख्या वाईट सवयी, कुटुंबाचे दैन्य, दारिद्र्य, वेगवेगळे कडवट अनुभव, विविध ग्रामीण नागरी भाषेचे पडसाद या साऱ्याचे चित्रण आत्मकथनांतून आले आहेत.

## आत्मकथनांचे वर्गीकरण करताना दोन विभागात केले आहे.

### १) दलितांची आत्मकथने :-

बलुत -दया पवार (१९७८) आठवणींचे पक्षी - प्र.ई. सोनकांबळे, (१९७९) मु. पो. देवाचे गोठणे - माधव कोंडविलकर (१९७९), काट्यावरीच पोटं - उत्तम बंडु तुपे (१९८१), तराळ - अंतराळ - शंकरराव खरात (१९८१), अंत:स्फोट -प्रा.कुमुद पावडे (१९८१),फांजर -नानासाहेब झोडगे (१९८२), मिटलेली कवाडे - मुक्ता सर्वगोड (१९८३), गावकी - रुस्तुम अचलखांब (१९८३), आभरान - पार्थ पोळके (१९८४), धुळपाटी - श्रीरंग तलवारे (१९८५), कोंडाळ - प्रा. तुषार भाग्यवंत (१९८६), झळा - ल. स. रोकडे (१९८६),माज्या जल्माची चित्तरकथा- शांताबाई कृष्णाजी कांबळे(१९८६), जिणं आमचं - बेबी कांबळे (१९८६), मान्हुडा - पा. उ. जाधव (१९८६), जातीला जात वैर - ना. म. शिंदे (१९९१), ख्रिस्ती महार - बाळासाहेब गायकवाड(१९९०), मरणकळा- द. शि. सवाखेडे (१९९३), दे दान सुटे गिऱ्हाण -आर. के. त्रिभुवन (१९९३), टाच -प्रल्हाद चेंदवणकर (१९८४), आमचा बाप आणि आम्ही - नरेंद्र जाधव (१९९३),बावळट - गौतम कावळे (१९९८), झुंज - रामराव झुंजारे (१९९८), सोनजातक -रतनलाल सोनाग्रा (१९९८), आदोर - नजुबाई गावीत (१९९५), कुस्ती -विजय सिरसाट, जेव्हा रापी बोलु लागते - राम दतोंडे, घराणं तमासगिराच - शशीकांत तासगावकर, हकीकत आणि जटायु- प्रा. केशव मेश्राम, आयदान - उर्मिला पवार (२००३).

## २. भटक्या जातीची आत्मकथने

उपरा - लक्ष्मण माने (१९८०), गबाळ - दादासाहेब मल्हारी मोरे (१९८३), बेरड - भीमराव गस्ती (१९८७), उचल्या - लक्ष्मण गायकवाड (१९८७), तांडा - आत्माराम राठोड (१९९०), मरणकळा - जनाबाई कचरु गिऱ्हे (१९९२), कोल्हाट्याचं पोरं - किशोर शांताबाई काळे (१९९४), ऐरणीच्या घणा - वैजनाथ कळसे (१९८६), आत्मकथा काटेरी तारेच्या कुंपणाची - भीमराव जाधव (१९९५), भटक्या - के.ओ.गिऱ्हे (१९९०), तीन दगडाची चूल - विमल मोरे, फिरस्तु-रामचंद्र नलावडे (१९९७).

## ८. सारांश

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिकतेचा वारसा घेऊन आपली व्यथा, वेदना, विद्रोह व नकार ज्या साहित्यिकांनी आपल्या साहित्यात मांडले त्या साहित्याला दलित साहित्य म्हणावे. प्रस्थापित साहित्यापेक्षा वेगळे साहित्य दलित साहित्यिकांनी निर्माण केले. आपल्या समाजाला वर्षानुवर्षे जी गुलामगिरी भोगायला मिळाली. ती दलित साहित्यिकांनी आपल्या कथा, कादंबरी, नाटक व आत्मकथन तसेच वैचारिक लेखनातून मांडलेले आहे. दलित साहित्य निर्मितीच्या पाठीमागे डॉ. आंबेडकर व त्यांची वैचारिक चळवळ हिच प्रामुख्याने उभी असलेली आपल्याला दिसून येते.

आत्मचरित्राच लेखन उतारवयात होते. पण आत्मकथने तारुण्यात लिहिली गेली आहेत. त्यामुळे आत्मचरित्रापेक्षा आत्मकथनांच्या मध्ये पारदर्शकता आलेली आपल्याला दिसून येते. आत्मकथनाला स्वकथन या संज्ञेपेक्षा आत्मकथन हीच संज्ञा योग्य वाटते. कारण त्यातून एकाच वेळी आत्मदर्शन आणि समाजदर्शन, एकाचवेळी आत्मबोध आणि समाजसंघर्ष वाचकाला अनुभवण्यास मिळतात. चोखामेळा व कर्ममेळा यांनी जरी आपल्या वेदना मराठी प्राचीन साहित्यात मांडल्या असल्या तरी त्यात विद्रोहापेक्षा विनवनीचा स्वर असलेला दिसतो. त्यामुळे हे लोक दलित साहित्याचे आदीरुप ठरु शकत नाही. दलित आत्मकथनांच्या अनंत प्रश्नांच्यामधून आपल्या भोवतालचे अस्वस्थ, दुःखी जग परिवर्तनाच्या दिशेने जाते आहे. याचा प्रलय येतो. ज्या परंपरागत व्यवस्थेने दलितांना गुलामीचे जिणे दिले. त्या साऱ्यांना नकार देत एकूणच मराठी साहित्य रुंदावण्याचे काम दलित

14750

साहित्याने केले आहे. आत्मकथनकार जेव्हा सांगत असतो. ते त्याच्या गतकाळातील संचित असते. हे संचित म्हणजे त्याच्या भावभावनांचे जाणिवां चे आकलनाचे जणु सारच असते. सुरवातीला प्र. ई. सोनकांबळे यांच्या 'वाटाड्या' नावाच्या लेखाने दलित साहित्यातील आत्मलेखनाला सुरवात झाली आहे.

आत्मकथने रंजनासाठी कल्पना विलासासाठी लिहिलेली नसून आपण भोगलेल्या भोगांची प्रस्थापित समाज व्यवस्थेने त्यांच्यावर लादलेल्या दुःखद जीण्याची कहाणी ही त्यांना वाचकांना सांगावयाची आहे. म्हणून दलित आत्मकथनातील मी हा प्रातिनिधीक स्वरुपाचा आणि व्यक्तीगत जाणिवांनी युक्त अशा दोन्ही स्वरूपात प्रकट झालेला असतो.

इथल्या मनुप्रणित समाज व्यवस्थेने दलित समाजाला अनेक चुकीच्या समजुतीत आडकुन प्रगती पासून दुर ठेवलेले आहे. या सगळ्याचा राग या दलित आत्मकथनाच्या नायक नायिकेला आहे. म्हणून भरडल्या गेलेल्या आपल्या समाजाविषयीचा कळवळा आत्मकथनामध्ये प्रामुख्याने दिसून येतो. समाज व्यवस्थेने दलितांना सर्व सुख सोईंच्यापासून कायमपणाने दूर ठेवल्यामुळे दलितांच्यामध्ये भूक ही मूलभूत प्रश्न बनून येते. याचच चित्रण दलित आत्मकथनांच्या मध्ये प्रामुख्याने दिसून येते.

आत्मकथनात वापरलेली भाषा समाजाची बोली भाषा आहे. निवेदनातील भाषेवर लेखकाच्या स्वभाववृत्तीचा ही परिणाम होतो. त्यातून त्याची लेखन शैलीही निर्माण होते. त्यातुन त्यांच्या शोषिक पणातील समाधानीवृत्तीचे दर्शन होते. समाज वास्तवाचे दर्शन लेखक आपल्या आत्मक्थनातून करताना दिसतात.

## ९. निष्कर्ष

१) आयुष्य जगत असताना आलेल्या चांगल्या वाईट अनुभवांचे तटस्थपणे केलेले सिंहावलोकन म्हणजे आत्मचरित्र होय.

२) वर्षानुवर्षे सोसलेलं दु:ख, अन्याय, अत्याचार, पिळवणूक याच त्या त्या समाजातील नायकाने मोठ्या समर्थपणे केलेल चित्रण म्हणजे दलित आत्मकथन होय.

३) आत्मचरित्रे ही आयुष्याच्या उत्तरार्धात लिहिली आहेत.

४) आत्मकथने मात्र एखादा अपवाद वगळता ऐन उमेदीच्या काळात लिहिली गेली आहेत.

५) दलित आत्मकथन सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व सांस्कृतिक संदर्भा-शिवाय असुच शकत नाही.

६) परंपरांच्या चौकटीत होरपळून निघालेला माणूस त्या माणसाचा समूह त्यांचे जगणे मरणे समाज आणि संस्कृतीच्या परिघातील वर्तन व्यवहार ही दलित आत्मकथने व्यक्त करतात.

७) दलित आत्मकथनांच्या मध्ये दलितांना कराव्या लागणाऱ्या जीवन संघर्षाची चित्रे मोठ्या प्रमाणात रेखाटली आहेत.

८) आत्मकथनांच्या मध्ये प्रामुख्याने अस्पृश्यतेमुळे निर्माण होणाऱ्या परिस्थिती चे चित्रण केलेले आहे.

९) दलित आत्मकथनांच्यामध्ये भेटणारी माणसे धाडसी, प्रामाणिक तसेच आपले संचित आपण जपले पाहिजेत भोग भोगले पाहिजेत असे वाटणारी आहेत.

१०) दलित आत्मकथनात येणाऱ्या सर्व स्त्रिया जीवनातले हलाहल पचवून पुरुषांना खंबीरपणे आधार देणाऱ्या आहेत.

११) लेखकाच्या जाती-जमातीचा संस्कार दलित आत्मकथनातील भाषेवर पडलेला प्रामुख्याने दिसून येतो.

१२) प्र.ई. सोनकांबळे यांनी लिहिलेल्या 'वाटाड्या' नावाच्या आत्मकथनपर लेखकाने दलित आत्मकथनाला सुरवात झाली व अजूनही तीची निर्मिती अखंड चालू आहे.

## संदर्भ ग्रंथसूची

१) प्रा.रा.ग. जाधव -

मराठी विश्वकोष खंड २ रा, पृष्ठ क्रं. ११

२) डॉ. स.दा कऱ्हाडे - पृष्ठ क्रं. १०९

चरित्र - आत्मचरित्र, मुंबई - (१९७६).

३) डॉ. वसंत बोरगावकर - प्राचीन मराठी वाड्.मयातील चरित्रात्मक आणि

आत्मचरित्रात्मक लेखनांचा अभ्यास, (अप्रकाशीत प्रबंध),

डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ, पृष्ठ क्रं. १३२.

४) डॉ. विमल भालेराव - (साहित्य प्रसार केंद्र, नागपुर, १९८६)

आधुनिक मराठी वाड्.मयातील स्त्रियांची आत्मचरित्रे, पृष्ठ क्रं. १६.

५) प्रा. रा. ग. जाधव - 'अस्मितादर्श' दिवाळी अंक (१९८३)

(दलित आत्मकथा, विशेषांक), पृष्ठ क्रं. ९१

६) डॉ. भालचंद्र फडके - 'अस्मितादर्श दिवाळी' अंक( १९८३)

( दलित आत्मकथा, विशेषांक ), पृष्ठ क्रं. ८५.

७) डॉ. स.दा. कऱ्हाडे 'अस्मितादर्श' दिवाळी अंक (१९८३)

( दलित आत्मकथा , विशेषांक ), पृष्ठ क्रं. ११८

८) प्रा. प्रकाश मेदकदकर - अस्मितादर्श'दिवाळी अंक (१९८३)

( दलित आत्मकथा , विशेषांक ), पृष्ठ क्रं. ९९

९) प्रा. चंद्रकुमार नलगे व डॉ. गंगाधर पानतावणे -

'अस्मितादर्श' दिवाळी अंक (१९८३), ( दलित आत्मकथा विशेषांक )

१०) अशोक पाटील - अनुष्टुभ (१९८६)
(जा. फे .मा), पृष्ठ क्रं. ३४

११) डॉ. यशवंत मनोहर - ऋतुगंध / दिवाळी अंक (१९८७),
'दलित स्वकथने', पृष्ठ क्रं. २७

१२) प्रा. रा. ग. जाधव - निळी पहाट (१९७८)
श्री विद्या प्रकाशन, पुणे. पृष्ठ क्रं. ४७

१३) दलित आत्मकथने - प्रस्तावना - संपा - प्रा. नलगे, डॉ. पानतावणे
सुरेश एजन्सी, पुणे. पृष्ठ क्रं. ५

१४) डॉ. वासुदेव मुलाटे - सहा दलित आत्मकथने एक चिंतन
स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद. पृष्ठ क्रं. ५२, (१९९९)

१५) प्रा. वा.ल.कुलकर्णी - साहित्य शोध आणि बोध (१९६७)
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. पृष्ठ क्रं. २९.

१६) शंकरराव खरात - तराळ - अंतराळ, कॉन्टीनेंटल प्रकाशन,
पुणे (१९८१) (प्रथमावृत्ती ), पृष्ठ क्रं. ४५

१७) बेबी कांबळे - जिणं आमुचं, रचना प्रकाशन , पुणे. (१९८६)
पृष्ठ क्रं. १३

१८) लक्ष्मण माने - उपरा ,ग्रंथाली प्रकाशन, मुंबई. (१९८१)
पृष्ठ क्रं. ८५

१९) बेबी कांबळे - जीणं आमुचं, मानसन्मान प्रकाशन, पुणे ( १९८६),
पृष्ठ क्रं. ३७

२०) आक्करमाशी - शरणकुमार लिंबाळे , श्री. विद्या प्रकाशन, पुणे .( १९८४)
पृष्ठ क्रं. १४

२१) अक्करमाशी - शरणकुमार लिंबाळे, श्री. विद्या प्रकाशन, पुणे. ( १९८४)
पृष्ठ क्रं. २२.

२२) द. शि. सवाखंडे - मरणकळा, (१९९३), पृष्ठ क्रं. ३८

२३) प्र. ई. सोनकांबळे - आठवणीचे पक्षी चेतना प्रकाशन, ( १९७९)
औरंगाबाद. पृष्ठ क्रं. ५६

२४) लक्ष्मण माने - उपरा, ग्रंथाली प्रकाशन, मुंबई. (१९८१)
पृष्ठ क्रं. ७